# दि. २३/०२/२०२० रोजीच्या आमसभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई ची ५८ वी आमसभा **रविवार** दि. **२३/०२/२०२०** रोजी सकाळी ११.०० वा. ठिकाण **''माँ वैष्णवी पॅलेस'' एम.आय.डी.सी. रोड, बीड** या ठिकाणी अध्यक्ष प्रकाश भिमराज कराळे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सर्व कार्यकारणीचे स्वागत समितीने स्वागत केल्यानंतर सभेचे कामकाज सुरु झाले. प्रारंभी सर्व सभासदांना संघटनेचा ५८ वा अहवाल व सभेची नोटिस आर्थिक पत्रके वाटप करण्यात आली. तदनंतर संघटनेचे जनरल सेक्रेटरी हेमंत ढमढेरे यांनी परीक्षा सचिव अभिलाषा नाईक यांना अहवाल वाचन करण्याची अनुमती दिली त्याप्रमाणे सौ. अभिलाषा नाईक यांनी ५८ व्या आमसभेच्या प्रारंभी दिवंगतांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा ठराव वाचुन दाखविला. सर्व सभासदांनी २ मिनेट उभे राहून दिवंगतांना श्रध्दांजली अपर्ण केली. तदनंतर अध्यक्षांचे परवानगीने सभेचे विषय पत्रिके प्रमाणे सभेचे कामकाज सुरु करणेत आले.

**विषय नं. १** **संघटनेच्या ५८ व्या आमसभेचे विषयपत्रिकेचे वाचन करणे.**

**ठराव क्र. १** संघटनेच्या ५८ व्या वार्षिक आमसभेचे आयोजन ''माँ वैष्णवी पॅलेस''एम.आय.डी.सी.रोड, बीड येथे करण्यात आले. त्या अनुषंगाने आमसभेतील १ ते ११ विषयांचे वाचन करण्याची सुचना अध्यक्षांनी केली. त्यानुसार जनरल सेक्रेटरी श्री. हेमंत ढमढेरे यांनी वार्षिक सभेतील १ ते ११ विषयांचे वाचन केले. याप्रमाणे अहवालात नमुद केलेली आमसभेची नोटीस स्विकारण्यात येऊन सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**सुचक : श्री. प्रकाश कराळे**
**अनुमोदक : श्री. प्रकाश रेळेकर**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं. २** **संघटनेच्या २८ जानेवारी २०१९ रोजी झालेल्या ५७ व्या आमसभेचे इतिवृत्त कायम करणे.**

**ठराव क्र. २** संघटनेची मागील आमसभा दि.२८/१/२०१९ रोजी झालेल्या आमसभेतील विषयांचे वाचन केले. त्यावर झालेल्या ठरावाच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्याप्रमाणे सदरचे इतिवृत्त सभेतील चर्चेनुसार बरोबर लिहिले असल्याने आजच्या सभेत वाचून कायम करण्यात येवून ठराव मंजर करण्यात आला. सभेत सभासदांनी ५८ वा अहवाल अत्यंत चांगला झाल्याचे भावना व्यक्त करुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : सौ. उषा जाधव**
**अनुमोदक : श्री. उत्कर्ष गवते**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं. ३** **सन २०१९-२०२० च्या अहवालाची नोंद घेणे.**

**ठराव क्र. ३** सन २०१९-२० या वर्षात संघटनेने केलेल्या कामाचा अहवाल, आमसभा नोटिस व आर्थिक पत्रके प्रसिध्द करण्यात येऊन सर्व सभासदांना वितरीत करण्यात आले. संघटनेचे जनरल सेक्रेटरी श्री. हेमंत ढमढेरे यांनी सभेत अहवालाचे वाचन करुन उपस्थित सभासदांना संघटनेच्या व सभासदांच्या हितासाठी केलेल्या सर्व कार्याची इतंभूत माहिती अहवालात दिली असल्याने सर्व सभासदांनी त्याचे स्वागत केले. संघटनेचे आजीव सभासद तसेच नवीन झालेले आजीव सभासदांची संख्या, परीक्षा विभागाचे कामकाज, परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हा निहाय संख्या इ. संघटनेने केलेल्या कामाचा गोषवारा सादर करण्यात आला. संघटनेची सांपत्तिक स्थिती, बँकखात्याची माहिती तसेच संघटनेने शासनाकडे सादर केलेल्या विविध मागण्यांची संपूर्ण माहिती अहवालातून प्रसिध्द केली आहे. सभेमध्ये अहवालाची नोंद घेऊन सभासदांनी अभिनंदन करुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : श्री. सुरेश देवरे**
**अनुमोदक : श्री. सुभाष नाईकवाडे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.४** **मा. चार्टर्ड अकौंटंट यांचेकडून प्रमाणित झालेले असोसिएशनचे ३१/३/२०१९ अखेरच्या आर्थिक पत्रकांना मान्यता देणे.**

**ठराव क्र.४** संघटनेचे दि. ३१/३/२०१९ चे आर्थिक पत्रके मा. चार्टर्ड अकौंटंट श्री.अभय कटारिया यांनी लेखापरीक्षण करुन प्रमाणित होऊन प्राप्त झालेले आर्थिक पत्रके आमसभेत कोषाध्यक्ष श्री. सुभाष बागड यांनी वाचून दाखविले. सदरच्या आर्थिक पत्रकांवर सभेत चर्चा होऊन संघटनेची आर्थिक स्थिती, बँक खात्यांतील शिल्लक, मुदत ठेवी आदिंची माहिती सादर केली गेली. संघटनेची सांपत्तिक स्थिती दिवसेंदिवस चांगली होत असल्याने समाधान व्यक्त करण्यात आले.सादर केलेले नफा-तोटा व ताळेबंद पत्रके मंजुर करण्यात आले. कोषाध्यक्ष सुभाष बागड यांचे अभिनंदन करण्यात येवुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : श्री. जे.के. वाघमारे**
**अनुमोदक : श्री. अरुण चव्हाण**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.५** **शासनाकडील व महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडील माण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.**

**ठराव क्र.५** शासनाकडील व परीक्षा परिषदेकडील व त्याच बरोबर इतर विभागाकडील सादर करण्यात आलेल्या पुढिल मागण्या सोडविण्याकामी राज्य कार्यकारणी सदस्यांनी प्रयत्न करावे असे ठरले.

**राज्य परिषदेकडील मागण्या :-** १) शासनाकडील १ ते १३ मागण्याबाबतचे प्रस्ताव त्वरीत सादर करणे. २) GCC-TBC परीक्षा गुणवत्ता सुधारण्याकामी सुधारीत गुणदान पध्दत व ४० % पासिंग पध्दत लागू करणे.(खानविलकर समिती अहवाल) ३) संगणक टंकलेखन पध्दतीने लघुलेखनाच्या ऑनलाईन नुतनीकरण मान्यता देणे. ४)स्पेशल स्किल ५० श.प्र.मि. अभ्यासक्रम ६ महिने मुदतीचा करुन सुधारीत पूर्वअटीचा शासन आदेश निर्गमित करणे. ५) टंकलेखन, संगणक टंकलेखन परीक्षेचा निकाल ३० दिवसांत जाहीर करणे. ६)मान्यता नुतनीकरण व संकेत स्थळावर अपलोड झालेली डॉक्युमेंट संस्था लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देणे. (ऑनलाईन पत्रव्यवहाराची इंतभूत माहिती लॉगीनमध्ये उपलब्ध करणे). ७)प्राश्निक,समिक्षक,परिक्षक यांचे मानधन वाढविणे व प्राचार्य यांना वर्ग १ व वर्ग २ प्रमाणे प्रवासभत्ता देणे. ८) शासनाने मंजुर केलेल्या अभ्यासक्रम पुस्तिकेतीलच वस्तुनिष्ठ प्रश्न संगणक टंकलेखन परीक्षेसाठी निवडणे याकामी प्राधान्याने शासनमान्य संस्थांचे संस्थाप्रमुख,प्राचार्य व निदेशक यांची नियुक्ती करणे.९) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या जीसीसी, जीसीसी-टिबीसी परीक्षेचे वार्षिक वेळापत्रक जाहिर करणे (संगणक टंकलेखन परीक्षेचे सत्र बदल करणे) १०) टंकलेखन,लघुलेखन, संगणक टंकलेखन अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा १ महिन्यात घेणे. ११) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेत स्थळावर अपलोड केलेल्या सर्व बाबींची प्रिंट सुविधा उपलब्ध करुन देणे. १२) GCC,GCC-TBC परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड व विद्यार्थी यादी मागणी केलेल्या संस्थेस ईमेलव्दारे उपलब्ध करुन देणे. (अनाधिकृत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन प्रतिबंध करणेकामी) १३) GCC, GCC-TBC पारदर्शक परीक्षेसाठी समिती गठित करुन उपाय योजना करणे.

**शासनाकडील मागण्या :-** १) जीसीसी-टिबीसी अभ्यासक्रमाची सुधारीत गुणदान पध्दत लागू करणे (खानविलकर समिती अहवाल मान्य करणे ) २)महाराष्ट्र शासनाच्या शासकिय व निमशासकिय विभागांच्या नोकरभरतीच्या जाहिरातीत लिपीक /टंकलेखक पदासाठी राजपत्र व संगणक अर्हता आदेशातील MSCE, PUNE या GCC-TBC (संगणक टंकलेखन) अभ्यासक्रमाचा उल्लेख सक्तीचा करणे. ३)महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संगणक टंकलेखन अभ्यासक्रमाचे शासन आदेश ३१ ऑक्टो. २०१३ मधील अभ्यासक्रमानुसार पुस्तक निर्गमीत करणे. ४) संगणक अभ्यासक्रम स्पेशल स्किल ५० श.प्र.मि. ६ महिने कालावधीचा करण्यात येवून उच्च गतीच्या लघुलेखन परीक्षेस मॅन्युअल प्रमाणे पुर्व अट लागु करणे. ५) शासनाच्या मेगा भरती अथवा नियमित भरती प्रक्रियेत संगणक